दि २४/७/९६
दै. तरुणभारत

# मुलींना स्वतःचे व्यक्तिमत्व फुलविण्याचे स्वातंत्र्य द्यावे

## प्रा. डी. यू. पवार

कोल्हापूर, दि. २२ - येथील ताराराणी विद्यापीठाच्या शारदा मंदिरामध्ये कै. सरोजिनीदेवी तथा काकीजी यांची २८ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डी. यू. पवार होते. प्रथम सौ. राजलक्ष्मी जाधव यांनी काकाजींच्या प्रतिमेस पूजन केले. नंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उषाराजे हायस्कूल मधील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांनींना गणवेषाचे वाटप करण्यात आले.

आपल्या व्याख्यानात प्रा. डी. यू. पवार म्हणाले की मुलींना स्वतःचे व्यक्तिमत्व फुलविण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. आज स्त्रीकडे एक माणूस म्हणून पाहिले तरच तिच्यामध्ये माणूसपणा जिवंत राहून ती कार्य करेल. पुरूषाने सुद्धा स्त्रीचा आदर राखला पाहिजे. वेगवेगळ्या ठिकाणी पुरूषाचे जेवढे योगदान असते तेवढेच स्त्रीचे सुद्धा असते. म्हणून स्त्रीयांना स्वातंत्र्य दिले पाहिजे. स्वातंत्र्य दिले तर मणुष्य जबाबदारीने काम करतो.

संस्थेचे सेक्रटरी डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य रा. कु. कणबरकर आणि उपाध्यक्ष मा. रंगरावदादा पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जे. बी. शिंदे यांनी तर प्रा. सौ. भारती शेळके यांनी आभार मानले.